डाक, नोंद पोच देणे
प्र.२८०८

क्रमांक:एलसीएस-२६८७/२५१८/ज-३.

(महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ५. [illegible] १९९०

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा.
स. नं. १३८, न. भू. क्र. ११३, मौजे मानखुर्द
येथील भूखंड क्र. २, मधील २४४०.२५ चौ. मी.
क्षेत्र अणुगिरी सहकारी गृहनिर्माण संस्थेस
देण्याबाबत....

वाचा:-

समक्रमांकाचे दिनांक २०.६.१९९० चे हेतुपत्र आणि अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांचे पत्र क्रमांक सी/३५/एसी/डी-१११, दि. २१ ऑगस्ट, १९९० च्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे मानखुर्द येथील सर्वे क्र. १३८ न. भू. क्र. ११३ मधील भूखंड क्र. २ मधील १४४०.२५ चौ. मी. जमीन अणुगिरी सहकारी गृहनिर्माण संस्थेला त्यांच्या शासनाने मंजुरी दिलेल्या (यादी सोबत जोडली आहे) सदस्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यासाठी सदनिका बांधण्याकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक:एलसीएस-१०८३/१८८३/सीआर-२२२/ग-४, दिनांक १२ मे, १९८३ मधील तरतुदीनुसार सोबतच्या जोडपत्र दोन मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्ती आणि खालील अतिरिक्त अटींवर देण्यास शासन आता मान्यता देत आहे:-

[एक] प्रश्नाधीन जमिनीची दि. १.२.७६ रोजीची किंमत नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाकडून सत्वर ठरवून घेण्यात यावी. दरम्यान सदर जमिनीची दि. १.२.१९७६ रोजीची "तात्पुरती किंमत", प्रति चौ. मी. ला रु. १५०/- (एकशेपन्नास) प्रमाणे मानून शासनाच्या उपरोक्त दिनांक १२.५.१९८३ च्या धोरणात्मक आदेशातील तरतुदीनुसार देय ठरणारी हक्कांकराची रक्कम संस्थेकडून वसूल करावी.

[दोन] प्रश्नाधीन जमिनीची दि. १.२.७६ रोजीची अंतिम किंमत ठरविण्यात आल्यावर ती तात्पुरत्या किंमतीपेक्षा अधिक असल्याचे दिसून आले तर वरीलप्रमाणे भरण्यात आलेली हक्कांकराची तात्पुरती रक्कम व अंतिम किंमत यातील फरकाची रक्कम, व त्या रकमेवर प्रचलित दरानुसार, देय ठरणाऱ्या व्याजाच्या रकमेसह संस्थेकडून वसूल करावी.

...२/--

१५/१०/९०
D-II-B
९०६६९

(तीन) शासनाद्वारे अंतिमरित्या ठरविली जाणारी किंमत मान्य करुन वरीलप्रमाणे देय असणारी फरकाची रक्कम व्याजासह भरण्याबाबतचे मुचलका हमीपत्र संस्थेकडून घेण्यात यावे.

(चार) १२ सदस्यांची राहण्याची व्यवस्था करण्याचे प्रस्तावित करुन त्यांची यादी सादर केली होती. त्यापैकी ११ सदस्यांच्या नांवास शासनाने मंजूरी दिलेली आहे. संस्थेला प्रश्नाधीन जमिनीचा ताबा देण्यात आल्यावर अनुक्रमे तळपृष्ठ निर्देशांकाप्रमाणे जितक्या धारकांच्या सदनिका वगळून शिल्लक तेवढ्या सदस्यांच्या नांवांना, विहित मापदंडानुसार सदर व्यक्ती पात्र ठरत असल्यास अपर जिल्हाधिकारी यांनी मंजूरी द्यावी;

(पाच) सोबतच्या मंजूर सदस्यांच्या यादीतील अनुक्रमांक [११] येथील श्री. डी. रंगनाथन यांच्या सदस्यत्वास दिलेली मंजूरी ही त्यांच्याबाबतची सर्व माहिती त्यांनी योग्य त्या पुराव्यांसह अपर जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्याच्या व त्या माहितीच्या छाननीअंती त्यांच्याकडून अर्हतेच्या सर्व अटींची पूर्तता होत असल्याची खात्री अपर जिल्हाधिकारी यांनी करुन घेण्याच्या अधीन राहून देण्यात आली आहे.

२. अपर जिल्हाधिकारी, यांनी संस्थेकडून योग्य तो करारनामा करुन घ्यावा आणि संस्थेची रीतसर नोंदणी झाल्यानंतरच जमिनीचा सा रीतसर ताबा देण्याची कार्यवाही करावी.

३. कागदपत्रांची तंचिका सोबत परत करण्यात येत आहे.

४. हे शासन वित्त विभागाच्या ठराव क्रमांक ओडीओ-१७७७/१६८/७७/ दस्तरी-९, दिनांक २०.७.१९७७ द्वारे या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स्वाक्षरी)
[जयंत व. दिवाण]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

सोबत-१) कागदपत्रांची तंचिका
२) जोडपत्र १ व २.

प्रति :-

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
मुंबई.

प्रतिलिपी : माहितीसाठी अग्रेषित :-

आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

जमाबंदी आयुक्त, व संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, नवी मुंबई.

महाध्यक्ष संचालक, नगर रचना, मुंबई.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई उपनगर जिल्हा

जिल्हा निबंधक, भूमी अभिलेख, मुंबई.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

महालेखाकार, मुंबई.

वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती, ब-३ कार्यासन, महसूल वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

क्र.सी/कार्या-२/बी-२/११/सी-१११.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
सी.टेन.आर.डी.के.इमारत दुसरा मजला,
वांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

वाचले :-

दिनांक :- २८ मे,१९९१.

शासन महसूल व वन विभाग शासन क्रमांक.एलसीएन-१९८७/९५१८/ज-३ दिनांक ४.१०.९०.

**आदेश :-**

मौजे मालवणी स.नं.२१८, न.भू.क्र.११३ मधील भूखंड क्र.२ मधील क्षेत्र १४००.७५ चौ.मी. ही जमीन सार्वजनिक प्रयोजनार्थ सदनिका बांधण्यासाठी शासन महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएन-१०८१/१८८१/सीआर-२२१/ग-४/ दि.१९.५.१९८१ मधील तरतुदीना आधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२- संस्थेने भूखंड क्र.२ क्षेत्र १४००.७५ व रोड खालील क्षेत्र १०८.१९ (एकूण क्षेत्र १५०९.९४ चौ.मी.) क्षेत्राची तात्पुरत्या व अंदाजाची सवलतीच्या दराची किंमत रक्कम रुपये २,२६,८८१.० (रुपये दोन लाख सव्वीस हजार आठशे एक्याऐंशी मात्र) या कार्यालयाचे दि.५.११.९०च्या आदेशान्वये भरणा केली आहे. उपरोक्त संस्थेने भरणा केलेली रक्कम तात्पुरती व अंदाजाची किंमत प्रति चौ.मी. १५० रुपये प्रमाणे मानून शासनाच्या उपरोक्त दि.१९.५.८१च्या धोरणात्मक आदेशातील तरतुदीनुसार आकारण्यात आली आहे. प्रस्तावित भूखंडाची दि.१.२.१९७६ रोजीची अंतिम किंमत ठरविण्यात आल्यावर ती उपरोक्त तात्पुरत्या किंमतीपेक्षा अधिक आल्याचे दिसून आले तर संस्थेस फरकाची व तात्पुरती रक्कम व अंतिम किंमत यातील फरकाची रक्कम व त्या रकमेवर प्रचलित दराने देय ठरणाऱ्या व्याजाची रक्कम भरावी लागेल व तसा प्रकारचे हमीपत्र संस्थेने १० रुपयाच्या मुद्रांक पेपरवर लिहून दिलेले आहे.

३- उपरोक्त शासन, आपणातील परिच्छेद १ मधील अट ४ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे संस्थेने प्रस्तावित केलेल्या १२ पैकी ११ सदस्यांना तत्वत: मान्यता देण्यात आली आहे तर मंजूर सदस्यांच्या यादीतील अनुक्रमांक (११) समोरील श्री.डी.रंगनाथन यांच्या सदस्यत्वास दिलेली मंजूरी ही त्यांच्याकडून अर्जातील सर्व अटींची पूर्तता होत असल्याची खात्री जिल्हाधिकारी यांनी करून

[illegible]

पु.पा.पहा.

३८९

घेण्याच्या आधिन राहून देण्याचे शासनाचे निर्देश होते. याबाबतीत संस्थेने सदर सदस्याबाबत भारत सरकार परमाणु उर्जा विभाग यांचेकडील प्रमाणपत्र दिनांक २९.१.९१ अन्वये त्यांचे वास्तव्य माहे जानेवारी ७४ ते नोव्हेंबर ७४ पर्यंत मुंबई होते. असे प्रमाणित केल्याने व त्यामुळे त्यांच्या वास्तव्याबाबतच्या अटींची पूर्तता होत असल्याने त्यांच्याही सदस्यत्वास मान्यता देण्यात येत आहे.

४/- उपरोक्त संस्थेची नोंदणी सहायक निबंधक, सहकारी संस्था एम विभाग यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र क्र.बीबीएम/एचएसजी/टीसी/४१२० सन ९१ अन्वये झालेली आहे.

५/- सदरचे आदेश सोबतच्या जोडपत्रातील परिशिष्ट "अ" मधील-टीप-व अटी व शर्तींना आधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति,

मुख्य प्रवर्तक,
अणुशक्ती गिरी सहकारी गृहनिर्माण संस्था.

पीएमएस.२६५१२.

प्रत:- १) नगर भूमापन अधिकारी क्रमांक ८ मुंबई उपनगर जिल्हा यांजकडे आवश्यकत्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- प्रस्तावित जागेचा ताबा संस्थेस स्वाधीन देण्यात येऊन त्याचा आवश्यक मोजणी नकाशा (३ प्रतींमध्ये) सामान्य अनुज्ञापक या कार्यालयास सादर करावा.

२) तहसिलदार कुर्ला यांजकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३) मा.अवर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग यांस माहितीसाठी सादर.

४) मा.आयुक्त कोकण विभाग यांस माहितीसाठी सादर.

जिल्हाधिकारी
पीएमएस.२६५१२. स्वाक्षरीत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा.
यांनी सही करते

Scanned by CamScanner